गुन्हे अन्वेषण विभाग, घटक—१, ठाणे शहर.
दुरध्वनी क्रमांक—०२२२५३४३५६५, Email - cp.thane.thanecrime@mahapolice.gov.in

प्रेसनोट दि. १९/०१/२०१९

**" बनावट प्रमाणपत्राव्दारे परराज्यातील डी—फार्मसीची डिग्री मिळवुन त्याव्दारे मेडीकल स्टोअर्स चालविणारे टोळीस, गुन्हे शाखा, घटक—१, ठाणे कडुन अटक. "**

————००००००————

ठाणे शहर व आजुबाजुचे परिसरातील काही मेडीकल स्टोअर्समध्ये फार्मासिस्ट म्हणुन काम करणारे फार्मासिस्ट हे पुरेसे शिक्षण व ज्ञान नसताना दिप पॅरामेडीकल ऑर्गनायजेशन ढोकाळी, ठाणे या शिक्षण संस्थेतुन १० वी व १२ वी पासचे माध्यमिक शिक्षा परिषद महाराष्ट्र , माध्यमिक शिक्षा परिषद उत्तरप्रदेश व माध्यमिक शिक्षा परिषद अजमेर, नवी दिल्ली या नावाचे बनावट शैक्षणिक प्रमाणपत्र कोठुनतरी प्राप्त करून ते खरे असल्याचे भासवुन त्याआधारे डीफार्मसीचे सर्टिफिकेट प्राप्त करून त्याची महाराष्ट्र स्टेट फार्मसी काउंसील कडे नोंद करून मेडीकल चालवण्याचा परवाना प्राप्त करून त्यांना औषधे विक्रीचे कोणतेही ज्ञान नसताना त्या परवान्यावर मेडीकल चालवुन शासनाची व नागरिकांची फसवणुक करीत असले बाबतची गोपनिय माहीती गुन्हे शाखा ,घटक—१ चे सपोनिरी बागुल यांना प्राप्त झाली होती. सदर माहीतीच्या अनुषगाने दिपांकर सुनिलकुमार घोष, यांनी देखील अशा मेडीकल स्टोअर्सवर कारवाई करणे बाबत मा. पोलीस उपआयुक्त सो. गुन्हे, ठाणे यांचेकडे तक्रार केली होती. मा. वरिष्ठांनी सदरची बाब गांभीर्याने घेवुन कारवाई करण्याबाबत गुन्हे शाखा घटक—१ ठाणे चे वपोनिरी नितीन ठाकरे यांना सुचना दिलेल्या होत्या.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने गुन्हे शाखा घटक—१ चे वपोनिरी नितीन ठाकरे व पथकाने ठाणे शहरातील १) आदर्श मेडीकल खोपट ठाणे चे फार्मासिस्ट अरविंदकुमार लच्छीराम भट २) जय मेडीकल दिवा भिवंडी चे फार्मासिस्ट राजु दशरथ यादव ३) सेन्ट्रल मेडीकल काल्हेर भिवंडी चे फार्मासिस्ट बुधाराम बभुतराम आजेनिया ४) महावीर मेडीकल मनोरमा नगर ठाणे चे फार्मासिस्ट बलवंतसिंह खुशालसिंह चौहान यांना चौकशीकामी बोलावुन त्यांचेकडील शैक्षणिक कागदपत्रांची पडताळणी करून केलेल्या चौकशीमध्ये ते १० वी व १२ वी परिक्षा अनुतीर्ण असताना त्यांनी ठाणे ढोकाळी येथील दिप पॅरामेडीकल ऑर्गनायजेशन या संस्थेमध्ये प्रवेश घेवुन कोणत्याही प्रकारचे शिक्षण न घेता व परिक्षा न देता इयत्ता १० वी व १२ वी पासचे माध्यमिक शिक्षा परिषद महाराष्ट्र , माध्यमिक शिक्षा परिषद उत्तरप्रदेश, माध्यमिक शिक्षा परिषद अजमेर, नवी दिल्ली या संस्थाच्या नावांचे बनावट शैक्षणिक प्रमाणपत्र व डीफार्मसीचे प्रशिक्षण न घेता बनावट डीफार्मसीचे प्रमाणपत्र सदर संस्थेचे चेअरमन पुरूषोत्तम ताहीलरामानी यांचेकडुन प्राप्त केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. तसेच प्राप्त १० वी, १२ वी चे प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे., कार्यालय वाशी, नवी मुंबई येथुन तपासणी करता ती बनावट असल्याची माहीती प्राप्त झाली. त्यावरून तक्रारदार दिपाकंर घोष यांचे तक्रारीवरून सदर इसमाविरूध्द कापुरबावडी पोलीस स्टेशन ठाणे येथे गु.र.न.। १४/२०१९ भादवि ४२०,४६५,४६७,४६८,४७१,३४ प्रमाणे दिनांक १८/०१/२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयात १) फार्मासिस्ट अरविंदकुमार लच्छीराम भट रा. ठाणे २) फार्मासिस्ट राजु दशरथ यादव रा.ठाणे ३) फार्मासिस्ट बुधाराम बभुतराम आजेनिया रा.भिवंडी ४) फार्मासिस्ट बलवंतसिंह खुशालसिंह चौहान रा. ठाणे व दिप पॅरामेडीकल ऑर्गनायजेशन ढोकाळी ठाणे या संस्थेचे चेअरमन पुरूषोत्तम ताहीलरामानी रा.मुलुंड मुंबई यांना अटक करण्यात आली आहे. त्यांना मा.न्यायालयाने पुढील तपासकामी दिनांक २४/०१/२०१९ पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा घटक—१ ठाणे चे सपोनिरी/संदीप बागुल हे करीत आहेत.

वरील कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा. पोलीस सह आयुक्त श्री.मधुकर पाण्डेय, मा.अपर पोलीस आयुक्त श्री. प्रविण पवार, गुन्हे, मा. पोलीस उप आयुक्त श्री. दिपक देवराज, गुन्हे, मा. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. बाजीराव भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक—१, ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक रणवीर बयेस, सपोनिरी संदीप बागुल, पोउपनिरी अशोक माने, पोहवा/आंनदा भिलारे, पोहवा/संभाजी मोरे, पोहवा/प्रकाश कदम, पोहवा/सुनिल माने, पोहवा/सुनिल जाधव, पोहवा/शिवाजी गायकाड, पोना/अजय साबळे व पथकाने केली आहे.

————०००००————


महाराष्ट्र पोलीस
OPJS UNIVERSITY CHURU

